CNR No :- MHSI100003092021

–: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३८/२०२१ :–

–: निशाणी ५० वरील आदेश :–

प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुद्ध पारीत झालेला "पुरावा बंद"चा आदेश रद्दबातल होण्यासाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या म्हणण्यानुसार, सदरहु दाव्याचे कामी प्रतिवादीने पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी याने पुढील सरतपास दिलेला आहे. त्यानंतर सदरहु दावा प्रतिवादी याचे उलटतपासाकरीता आहे. परंतु, मागील तारखेस प्रतिवादी व त्याचे कामकाज पाहणारे वकील हे मे. न्यायालयात उपस्थित नसल्याने प्रतिवादीचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. प्रस्तुत कामी प्रतिवादी हे कामानिमित्त गोवा येथे असल्याने त्यांना उपस्थित राहणे शक्य झाले नाही तर प्रतिवादीचे वकील हे त्यांचे वैयक्तिक कामानिमित्त बाहेरगावी असल्याने या मे. न्यायालयात उपस्थित राहू शकले नाहीत. प्रतिवादी यांचा प्रस्तुत दाव्याचे कामी मागिल तारखेस अनुपस्थित राहण्याचा कोणताही गैरहेतु नव्हता. प्रतिवादी यांना दाव्याचे कामकाज चालवायाचे असून प्रस्तुत कामी पुरावा द्यावयाचा आहे. सबब, प्रतिवादी यांचे विरुद्ध झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करण्यात येऊन प्रतिवादी याने दाखल केलेले पुराव्याचे शपथपत्र दाव्याचे कामी सामील करुन घेण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी वादीतर्फे म्हणणे मागविण्यात आले. वादीने अर्जावर

म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुरीस आक्षेप नोंदविलेला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ असल्याने नामंजुर करावा. तसेच अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त खर्च आकारण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे साक्षीदार क्र. १ अर्जुन ज्ञानेश्वर गवस यांस वारंवार पुकारता न्यायालयात गैरहजर राहील्याने दि.२५.०७.२०२५ रोजी नि.क्र.४३ वर आदेश पारीत करुन सदर साक्षीदाराचा पुरावा रद्द करण्यात आला. प्रतिवादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक व समाधानकारक नाही. न्यायालयाचा तसेच वादीचा अमुल्य वेळ प्रतिवादींच्या या कृत्यामुळे वाया गेलेला आहे. परंतु, प्रतिवादीस पुरावा सादर करण्याची उचित संधी नाकारणे हे नैसर्गीक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. अर्ज नामंजूर झाल्यास, प्रतिवादीस विविध ठिकाणी अर्जाच्या अनुषंगाने करावी लागणारी कार्यवाहीची पुनरावृत्ती करणेस भाग पडणारे आहे. प्रतिवादीने केलेल्या सदर कृत्याबाबत खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन होणारे आहे. तसेच प्रतिवादीस पुरावा सादर करण्याची संधी उपलब्ध करुन दिल्यास दावा गुणदोषावर निकाली करणेस न्यायालयास मदतच होणारी आहे. सबब, मी खालीलप्रमाणे पारीत करीत आहे :-

## -:: आदेश ::-

१. रक्कम रु.३००/-(रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन नि.क्र.५० वरील अर्ज मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी एकत्रीत प्रस्तुत अर्जाकामी झालेली खर्चाची रक्कम रु.३००/-(रुपये तीनशे मात्र) वादी यांना आदा केल्यावर त्यांच्या विरुद्ध पारीत झालेला दि.२५.०७.२०२५ रोजीचा नि.क्र.४३ वरील "पुरावा रद्द" चा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत आदेशाची पुर्तता न केल्यास, सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदीत व उद्घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2025.09.04 12:09:14 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)
दिनांक – ०४.०९.२०२५. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)दोडामार्ग.